# सुरक्षा रक्षक मंडळ बृहन्मुंबई आणि ठाणे जिल्हा

**(मध्यवर्ती कार्यालय)**

**(महाराष्ट्र खाजगी सुरक्षा रक्षक (नोकरीचे नियमन व कल्याण) अधिनियम, १९८१ च्या कलम ६(१) अन्वये स्थापिलेले)**

**कार्यालय :- डी-३०१/इ-३०१, सानपाडा रेल्वे स्टेशन कॉम्प्लेक्स, नवी मुंबई ४०० ७०५.**

****

# -: जाहिर सूचना :-

**दिनांक : १९.०५.२०२५**

आपणांस याद्वारे सूचित करण्यांत येते की, सद्यस्थितीत मंडळामार्फत कुठल्याही प्रकारची खुली/जाहिरातीद्वारे नोंदणी प्रक्रिया सुरु नाही, तसेच कुठल्याही प्रकारच्या मैदानी चाचणीचे आयोजन **सुरक्षा रक्षक मंडळ बृहन्मुंबई आणि ठाणे जिल्हा** या मंडळामार्फत करण्यात आलेले नाही. तसेच त्रयस्थ व्यक्ती अथवा दलालांकडून मंडळामध्ये भरती/नोंदणी प्रक्रिया सुरु असल्याचे भासविण्यांत येत आहे. तरी मंडळामध्ये अशा प्रकारची कोणतीही भरती/नोंदणी प्रक्रिया सध्या राबविली जात नाही. याबाबतीत कोणत्याही त्रयस्थ व्यक्तीवर विसंबून राहून कोणतेही आर्थिक व्यवहार करु नयेत. तसेच अशा प्रकारचे कोणतेही आर्थिक गैरव्यवहार झाल्यास त्यास मंडळ जबाबदार रहाणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी.

याद्वारे आपणास जाहिर आवाहन करण्यात येते की, आपण भुलथापांना बळी न पडता नजिकच्या पोलिस स्टेशन येथे तक्रार नोंदवावी व अधिक चौकशीसाठी मंडळाचे मध्यवर्ती कार्यालय येथे व्यक्तिशः संपर्क करावा.

**मा.अध्यक्ष/मा.सचिव**